**नि.दि.दा.क्र.३२/२०१७**
**नि.क्र.४६**

वादी करीता सा.क्र.१

**<u>प्रतिवादी क्र.२ व ३ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एम.के.वलांडे यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>**

तहसिलदार यांनी कार्यवाही जा.क्र.२०२५/जमाकावि/८८ मधील दि.०३/०४/२०२५ चा निर्णय मला मान्य आहे,साक्षीदार स्वत: सांगतात परंतू त्याची कार्यवाही झालेली नाही. तहसिलदार यांच्या त्या निर्णयाचा अंमल होण्यासाठी मी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जाची प्रत मी दाखल करू शकतो. मी तहसिलदार यांच्या निर्णयाविरूध्द अपील दाखल केले नाही.

प्रश्न- जा.क्र.२०२५/जमाकावि/८८ मधील दि.०३/०४/२०२५ मध्ये झालेला दि.१०/०१/२०२५ चा पंचनामा तुम्हाला मान्य असल्यामुळे तुम्ही काही पुढे कार्यवाही केली नाही ?

उत्तर- तो स्वत:च्या रानातून पाणी काढून देतो म्हणाला होता म्हणून मी कार्यवाही केली नाही.

तहसिलदार यांच्या निर्णयाप्रमाणे प्रतिवादी यांनी कार्यवाही केली हे म्हणणे खरे नाही. दावा दाखल होण्यापूर्वी दावा मिळकतीची मी मोजणी केलेली नाही, साक्षीदार पुन्हा स्वत: सांगतात खाजगी मोजणी पी.आय.च्या सांगण्यावरून शिक्षकाद्वारे केलेली होती. ते शिक्षक माने असे होते. त्या मोजणीचा अभिलेख मी दाखल केला नाही. दावा मिळकतीच्या पूर्वेस मी रस्त्यासाठी गट क्र.२४१ मधील जागा घेतली आहे. त्याबाबतचे तसे खरेदीपत्र नाही, साक्षीदार स्वत: सांगतात तसे स्टॅम्पवर लिहीलेले आहे. तो स्टॅम्प मी दाखल करू शकतो. न्यायालयीन आयुक्ताद्वारे मिळकतीची मोजणी होत असताना मी हजर होतो. सर्वे क्र.१५१/२३३ च्या चतु:सिमेतील लोकांना मोजणीच्या नोटिसा काढल्या होत्या किंवा कसे हे मला माहित नाही. सर्वे क्र.१५१/२३३ च्या चतु:सिमा मी सांगू शकतो. सर्वे क्र.१५१/२३३ मधील दावा मिळकतीच्या पूर्वेस- माझी स्वत:ची जमीन, पश्चिमेस- नागनाथ फुलारी यांची जमीन, दक्षिणेस- फुलारी यांची जमीन व उत्तरेस- माझ्या भावाची जमीन आहे. मला सर्वे क्र.१५१/२३३ मधील संपूर्ण क्षेत्राच्या चतु:सिमा मी सांगू शकत नाही.

सर्वे क्र.१५१/२३३ च्या चतु:सिमेतील लोक मोजणीसाठी हजर नव्हते. त्याची मोजणी उत्तरेकडून सुरू झाली होती. उत्तरेकडे व्यकंट धुमाळे व अंतेश्वर धुमाळे व एक प्रतिवादी यांचे क्षेत्र उत्तरेकडे आहे. त्यांच्या क्षेत्राच्या उत्तरेकडे कामगुंडा व ईतर आहेत. मोजणीचा सुरूवातीचा पॉईंट मोजणीदाराने शोधला. मी त्यावेळी झाडाखाली बसलो होतो. मोजणी अहवाल व नकाशा मी पाहिलेला आहे. माझी जमीन नकाशाप्रमाणे माधव यांच्याकडे निघालीच नाही, साक्षीदार पुन्हा सांगतात, माधवकडे केवळ १ गुंठा क्षेत्र निघाले. ते परत मिळण्यासाठी काही कार्यवाही केली नाही. दाव्यासोबत जोडलेला कच्चा नकाशा मी दिलेल्या माहितीप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे. मी दाव्यासोबत जोडलेल्या कच्चा हात नकाशात अतिक्रमण दर्शविले नाही, साक्षीदार स्वत: सांगतात अतिक्रमण नालीवरच आहे. दाव्यासोबतच्या कच्चा हात नकाशात दर्शविलेल्या चतु:सिमा व दाव्यात नमूद चतु:सिमा हया बरोबर आहेत. तहसिलदार यांच्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी म्हणून तहसिलकडे दिलेला अर्ज व दावा जमीनीच्या पूर्वेकडील क्षेत्राबाबत तयार केलेला मुद्रांक मी दाखल करू शकतो.

**प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास तहकूब**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.07.09 11:24:13 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक ०८/०७/२०२५.